धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर व पालघर या ६ जिल्हा परिषदेतील ८५ निवडणूक विभाग व त्याअंतर्गत ३७ पंचायत समित्यांमधील १४४ निर्वाचक गणांतील रिक्त पदांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक:-रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.०५/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १७ मार्च, २०२१.

प्रति,
जिल्हाधिकारी,
धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर व पालघर

विषय:- धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर व पालघर या ६ जिल्हा परिषदेतील ८५ निवडणूक विभाग व त्याअंतर्गत ३७ पंचायत समित्यांमधील १४४ निर्वाचक गणांतील रिक्त पदांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

संदर्भ :- १) मा.सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.९८०/२०१९, ९८१/२०१९, १४०८/२०१९ व ७४३/२०२० मधील दि.०४/०३/२०२१ रोजीचा निर्णय
२) राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.९/का.७, दि. ०५ मार्च, २०२१ व १६ मार्च, २०२१ चे पत्र
३) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का ७ दि.१७/३/२०२१

महोदय,

मा.सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र. ९८०/२०१९, ९८१/२०१९, १४०८/२०१९ व ७४३/२०२० मधील दि.०४/३/२०२१ रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने दि.०५ मार्च, २०२१ व १६ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या पत्रानुसार आपल्याद्वारे जिल्हयातील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या सर्व जागा दि.०४/०३/२०२१ पासून रिक्त झाल्याचे आदेश निर्गमित करुन संबंधितांना बजावण्यात आले. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन क्र. ३ च्या पत्रान्वये आरक्षण सोडत काढण्याचा कार्यक्रम दिला असून त्यानुसार प्रभाग रचनेची सुधारीत अंतिम अधिसूचना दि. २४/०३/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर रिक्त पदांच्या निवडणूकांकरीता मतदार यादी कार्यक्रम देणे क्रमप्राप्त आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादीच वापरण्यात येते. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत व संभाव्य मतदानाचा दिनांक लक्षात घेऊन मतदार यादी तयार

करण्यासाठी एक विशिष्ट दिनांक (Cut-off Date) अधिसूचित केला जातो. (जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चा कलम १३)

३. धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर व पालघर या ६ जिल्हा परिषदेतील ८५ निवडणूक विभाग व त्याअंतर्गत ३७ पंचायत समित्यांमधील १४४ निर्वाचक गणांतील रिक्त पदांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करताना जिल्हा परिषद निवडणूक विभागनिहाय व पंचायत समित्यांसाठी निर्वाचक गणनिहाय मतदार यादी विभाजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

४. **आदेश**

१) मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती - दिनांक ०१/०१/२०२१ हा अर्हता दिनांक धरुन भारत निवडणूक आयोगाकडून **दिनांक १५/०१/२०२१** पर्यंत अद्यावत केलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर व पालघर या ६ जिल्हा परिषदेतील ८५ निवडणूक विभाग व त्याअंतर्गत ३७ पंचायत समित्यांमधील १४४ निर्वाचक गणांतील रिक्त पदांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ०२/०२/२०२१ च्या अधिसूचनेन्वये **दिनांक १५/०१/२०२१ हा दिनांक Cut-off Date जाहीर केला** असून त्यादिवशी (म्हणजेच दिनांक १५/०१/२०२१ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी या सार्वत्रिक निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

२) वरील मतदार यादी ग्राहय धरुन धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर व पालघर या ६ जिल्हा परिषदेतील ८५ निवडणूक विभाग व त्याअंतर्गत ३७ पंचायत समित्यांमधील १४४ निर्वाचक गणांतील रिक्त पदांच्या अनुक्रमे परिशिष्ट २ मध्ये नमूद निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम परिशिष्ट १ प्रमाणे राहील:-

| | | |
|---|---|---|
| i. | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : दिनांक ०५/०४/२०२१ |
| ii. | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : दिनांक ०५/०४/२०२१ ते १२/०४/२०२१ |
| iii. | प्रभागनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | : दिनांक २०/०४/२०२१ |
| iv. | मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | : दिनांक २७/०४/२०२१ |

३. **प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :**

३.१. जिल्हाधिकारी यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे खालीलप्रमाणे प्रभागनिहाय विभाजन करावे.

a) आयोगाकडून युजरआयडी व पासवर्ड प्राप्त करुन Assembly Master, Ward Master इ. अपलोड करणे.

b) कंट्रोल चार्ट योग्य असल्याची खात्री करुन संगणक प्रणालीमधून मतदार यादीची पीडीएफ तयार करणे.

३.२. प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी :-

a) विधानसभा मतदार यादीत संबंधित निवडणूक विभाग व निर्वाचक गण क्षेत्रात समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि संबंधित निवडणूक विभाग व निर्वाचक गणासाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे, याची खातरजमा करण्यात यावी.)

b) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.०६/का.०५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

c) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का.५, दिनांक ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

d) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्यांमधील दुरुस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/ प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

३.३. महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे.

४. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-** प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार / नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला दिनांक ०५/०४/२०२१ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. (परिच्छेद ७ प्रमाणे)

**५. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

५.१. दिनांक ०५/०४/२०२१ ते दिनांक १२/०४/२०२१ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांनुसार फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल :-

i. लेखनिकांच्या काही चुका

ii. दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले

iii. संबंधित प्रभागातील विधानसभा यादीत मतदारांची नावे असूनही, पंचायत समितींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

५.२. विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

६. अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना दिनांक २०/०४/२०२१ रोजी मुद्दा क्र. ७ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

७. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

a) जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील सूचना फलक

b) स्थानिक वृत्तपत्र

c) स्थानिक केबल टि.व्ही.

d) जिल्हाधिकारी / जिल्हा परिषद कार्यालयातील संकेत स्थळ, इत्यादी.

**८. राज्यात उद्भवलेल्या कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर प्रत्येक मतदान केंद्रात ७०० ते ८०० मतदार जोडण्यात यावेत.**

९. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व तहसिलदार यांची राहील.

१०. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखाद्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीबाबत न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यास मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

११. मतदार यादीचा कार्यक्रम राबविताना कोवीड-१९ या साथीच्या आजाराच्या अनुषंगाने घ्यावयाची खबरदारी म्हणून पुढील नमूद उपाययोजना अवलंबून पूर्ण करता येईल. जसे की-

१) सर्वांच्या बैठकीची व्यवस्था पुरेसे अंतर ठेवून करणे.

२) मास्क वापरणे.

३) सामाजिक अंतर ठेवणे.

४) सॅनिटायझरचा वापर करणे.

५) आवश्यकतेनुसार थर्मल स्क्रिनिंग करणे.

तसेच केंद्र व राज्य शासनाने कोवीड-१९ च्या अनुषंगाने वेळोवेळी जाहीर केलेल्या विविध उपाययोजना व दक्षता घेण्याबाबत दिलेल्या सूचनांचे योग्य ते पालन करावे.

१२. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत-परिशिष्ट-१ व २

प्रत :-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक, अमरावती व नागपूर
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर व पालघर
६. महिती जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
७. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र. ०५/का.७, दि. १७/०३/२०२१

## परिशिष्ट-१

### धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर व पालघर या ६ जिल्हा परिषदेतील ८५ निवडणूक विभाग व त्याअंतर्गत ३७ पंचायत समित्यांमधील १४४ निर्वाचक गणांतील रिक्त पदांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची /पुर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक | दि.१५/०१/२०२१ |
| २ | राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार केलेली मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.०५/०४/२०२१ |
| ३ | मतदार यादीसंदर्भात हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. १२/०४/२०२१ |
| ४ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणाच्या छापील मतदार याद्या अधिनियमाच्या कलम १३ खाली अधिप्रमाणित करण्याची तारीख | दि. २०/०४/२०२१ |
| ५ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणांच्या छापील मतदार याद्या माहितीसाठी ठेवण्यात आल्या आहेत, याबाबतची सूचना प्रसिध्द करण्याची तारीख | दि. २०/०४/२०२१ |
| ६ | मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | दि. २७/०४/२०२१ |

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक १७/३/२०२१ सोबतचे

परिशिष्ट-२

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | धुळे | शिंदखेडा | १८-बेटावद |
| २ | धुळे | शिंदखेडा | १९-नरडाणा |
| ३ | धुळे | शिंदखेडा | २१-मालपूर |
| ४ | धुळे | शिंदखेडा | २४-खलाणे |
| ५ | धुळे | धुळे | ४२-लामकानी |
| ६ | धुळे | धुळे | ४४-कापडणे |
| ७ | धुळे | धुळे | ४५-फागणे |
| ८ | धुळे | धुळे | ४६-नगाव बु. |
| ९ | धुळे | धुळे | ४८-कुसुंबा |
| १० | धुळे | धुळे | ४९-नेर |
| ११ | धुळे | धुळे | ५२-बोरविहिर |
| १२ | धुळे | धुळे | ५३-मुकटी |
| १३ | धुळे | धुळे | ५४-शिरूड |
| १४ | धुळे | धुळे | ५५-रतनपुरा |
| १५ | धुळे | धुळे | ५६-बोरकुंड |

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | धुळे | शिरपूर | १५-अथे खु |
| २ | धुळे | शिरपूर | १६-विखरण बु |
| ३ | धुळे | शिरपूर | १८-तऱ्हाटी त.त. |
| ४ | धुळे | शिरपूर | १९-वनावल |
| ५ | धुळे | शिरपूर | २०-जातोडा |
| ६ | धुळे | शिरपूर | २१-शिंगावे |
| ७ | धुळे | शिरपूर | २२ -करवंद |
| ८ | धुळे | शिरपूर | २५-अजनाड |
| ९ | धुळे | शिंदखेडा | २९-दाऊळ |
| १० | धुळे | शिंदखेडा | ३४-वर्षी |
| ११ | धुळे | शिंदखेडा | ३९-हातनूर |
| १२ | धुळे | शिंदखेडा | ४३ -खर्दे बु |
| १३ | धुळे | शिंदखेडा | ४४-मेथी |
| १४ | धुळे | साक्री | ५१-दुसाणे |
| १५ | धुळे | साक्री | ५३-बळसाणे |
| १६ | धुळे | साक्री | ५४-घाणेगांव |
| १७ | धुळे | साक्री | ५५ -जेताणे |
| १८ | धुळे | साक्री | ७१-पिंपळनेर |
| १९ | धुळे | साक्री | ७२-चिकसे |
| २० | धुळे | साक्री | ७६-धाडणे |
| २१ | धुळे | साक्री | ७७-कासारे |
| २२ | धुळे | साक्री | ८१-म्हसदी प्र.नेर |
| २३ | धुळे | धुळे | ८३-लामकानी |
| २४ | धुळे | धुळे | ८८-न्याहळोद |
| २५ | धुळे | धुळे | ९० -फागणे |
| २६ | धुळे | धुळे | ९७ -नेर |
| २७ | धुळे | धुळे | १०१-सडगाव |
| २८ | धुळे | धुळे | १०४-बोरविहिर |
| २९ | धुळे | धुळे | १०५-मूकटी |
| ३० | धुळे | धुळे | १०७-शिरूड |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक १७/३/२०२१ सोबतचे

परिशिष्ट-२

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | अक्कलकुवा | ८-खापर |
| २ | नंदुरबार | अक्कलकुवा | ९- अक्कलकुवा |
| ३ | नंदुरबार | शहादा | २४-म्हसावद |
| ४ | नंदुरबार | शहादा | २९-लोणखेडा |
| ५ | नंदुरबार | शहादा | ३१-पाडळदे बु. |
| ६ | नंदुरबार | शहादा | ३५-कहाटुळ |
| ७ | नंदुरबार | नंदुरबार | ३८-कोळदे |
| ८ | नंदुरबार | नंदुरबार | ३९-खोंडामळी |
| ९ | नंदुरबार | नंदुरबार | ४०-कोपर्ली |
| १० | नंदुरबार | नंदुरबार | ४१-रनाळा |
| ११ | नंदुरबार | नंदुरबार | ४२-मांडळ |

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्र.व नाव |
|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | अक्कलकुवा | १६-कोराई |
| २ | नंदुरबार | शहादा | ४९-सुलतानपूर |
| ३ | नंदुरबार | शहादा | ५१-खेडदिगर |
| ४ | नंदुरबार | शहादा | ५३-मंदाणे |
| ५ | नंदुरबार | शहादा | ५८-डोंगरगांव |
| ६ | नंदुरबार | शहादा | ५९-मोहिदे तह |
| ७ | नंदुरबार | शहादा | ६१-जावेद तबो |
| ८ | नंदुरबार | शहादा | ६२-पाडळदे बु. |
| ९ | नंदुरबार | शहादा | ६६-शेल्टी |
| १० | नंदुरबार | नंदुरबार | ७३-गुजरभवाली |
| ११ | नंदुरबार | नंदुरबार | ७४-पातोंडा |
| १२ | नंदुरबार | नंदुरबार | ७६-होळ तर्फे हवेली |
| १३ | नंदुरबार | नंदुरबार | ८५-नांदर्खे |
| १४ | नंदुरबार | नंदुरबार | ८७-गुजरजांभोली |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक १७/३/२०२१ सोबतचे

परिशिष्ट-२

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निवडणुक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | अकोला | तेल्हारा | ०१-दानापुर |
| २ | अकोला | तेल्हारा | ०३-अडगांव बु. |
| ३ | अकोला | तेल्हारा | ४- तळेगांव बु |
| ४ | अकोला | अकोट | १०-अकोलखेड |
| ५ | अकोला | अकोट | १५-कुटासा |
| ६ | अकोला | मुर्तिजापूर | १७-लाखपुरी |
| ७ | अकोला | मुर्तिजापूर | १८-बपोरी |
| ८ | अकोला | अकोला | २६-घुसर |
| ९ | अकोला | अकोला | २९-कुरणखेड |
| १० | अकोला | अकोला | ३०-कानशिवणी |
| ११ | अकोला | बाळापुर | ३४-अंदुरा |
| १२ | अकोला | बाळापुर | ३९-देगांव |
| १३ | अकोला | बार्शिटाकळी | ४२-दगडपारवा |
| १४ | अकोला | पातुर | ४८-शिर्ला |

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | अकोला | तेल्हारा | ०३-हिवरखेड |
| २ | अकोला | तेल्हारा | ०६-अडगाव बु. |
| ३ | अकोला | तेल्हारा | १३-वाडी अदमपूर |
| ४ | अकोला | तेल्हारा | १४-भांबेरी |
| ५ | अकोला | अकोट | १८-पिंप्री खु. |
| ६ | अकोला | अकोट | १९-अकोलखेड |
| ७ | अकोला | अकोट | २५-मुंडगांव |
| ८ | अकोला | अकोट | २८-रौंदळा |
| ९ | अकोला | मुर्तिजापूर | ३४-लाखपुरी |
| १० | अकोला | मुर्तिजापूर | ३५-ब्रम्ही खु. |
| ११ | अकोला | मुर्तिजापूर | ३९-माना |
| १२ | अकोला | मुर्तिजापूर | ४६-कानडी |
| १३ | अकोला | अकोला | ४९-दहिहांडा |
| १४ | अकोला | अकोला | ५२-घुसर |
| १५ | अकोला | अकोला | ५७-पळसो |
| १६ | अकोला | अकोला | ५८-कुरणखेड |
| १७ | अकोला | अकोला | ६६-चिखलगांव |
| १८ | अकोला | बाळापूर | ७२-निमकर्दा |
| १९ | अकोला | बाळापुर | ७५-पारस भाग१ |
| २० | अकोला | बाळापुर | ७८-देगांव |
| २१ | अकोला | बाळापुर | ८०-वाडेगाव भाग-२ |
| २२ | अकोला | बार्शिटाकळी | ८३-दगडपारवा |
| २३ | अकोला | बार्शिटाकळी | ८६-मोन्हळ |
| २४ | अकोला | बार्शिटाकळी | ८९-महान |
| २५ | अकोला | बार्शिटाकळी | ९१-पुनोती-बु |
| २६ | अकोला | पातुर | ९६-शिर्ला |
| २७ | अकोला | पातुर | ९७-खानापूर |
| २८ | अकोला | पातुर | १०५-आलेगांव |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक १७/३/२०२१ सोबतचे

परिशिष्ट-२

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | वाशिम | कारंजा | २-भामदेवी |
| २ | वाशिम | मानोरा | १०-कुपटा |
| ३ | वाशिम | मानोरा | ११-तळप |
| ४ | वाशिम | मानोरा | १५-फुलउमरी |
| ५ | वाशिम | मंगरुळपीर | १९-दाभा |
| ६ | वाशिम | मंगरुळपीर | २२-कंझरा |
| ७ | वाशिम | मंगरुळपीर | २४-आसेगाव |
| ८ | वाशिम | मालेगाव | २८-पांगरी नवघरे |
| ९ | वाशिम | रिसोड | ३७-कवठा खु. |
| १० | वाशिम | रिसोड | ३९-गोभणी |
| ११ | वाशिम | रिसोड | ४१-भरजहागीर |
| १२ | वाशिम | वाशिम | ४३-काटा |
| १३ | वाशिम | वाशिम | ४४-पार्डी टकमोर |
| १४ | वाशिम | वाशिम | ५०-उकळीपेन |

| अनु.क्र | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | वाशिम | कारंजा | ४-मोहगव्हाण |
| २ | वाशिम | कारंजा | ७-उंबर्डा बाजार |
| ३ | वाशिम | कारंजा | १३-पोहा |
| ४ | वाशिम | कारंजा | १५-धामणी खडी |
| ५ | वाशिम | मानोरा | २०-धामणी |
| ६ | वाशिम | मानोरा | २४-कोंडोली |
| ७ | वाशिम | मानोरा | २६-गिरोली |
| ८ | वाशिम | मानोरा | २७-शेंदुरजना |
| ९ | वाशिम | मंगरुळपीर | ४०-पेडगांव |
| १० | वाशिम | मंगरुळपीर | ४२-वनोजा |
| ११ | वाशिम | मंगरुळपीर | ४५-कासोळा |
| १२ | वाशिम | मंगरुळपीर | ४८-सनगांव |
| १३ | वाशिम | मालेगांव | ४९-मारसुळ |
| १४ | वाशिम | मालेगांव | ५३-जऊळका |
| १५ | वाशिम | मालेगांव | ५४-जोडगव्हाण |
| १६ | वाशिम | मालेगांव | ६४-शिरपूर-२ |
| १७ | वाशिम | मालेगांव | ६६-खंडाळा शिंदे |
| १८ | वाशिम | रिसोड | ७३-कवठा खु. |
| १९ | वाशिम | रिसोड | ७५-हराळ |
| २० | वाशिम | रिसोड | ७९-वाकद |
| २१ | वाशिम | रिसोड | ८०-महागाव |
| २२ | वाशिम | वाशिम | ८२-मोप |
| २३ | वाशिम | वाशिम | ९०-फाळेगांव थेट |
| २४ | वाशिम | वाशिम | ९२-कळंबा महाली |
| २५ | वाशिम | वाशिम | १००-उकळीपेन |
| २६ | वाशिम | वाशिम | १०१-अनसिंग |
| २७ | वाशिम | वाशिम | १०२-पिंपळगांव |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक १७/३/२०२१ सोबतचे

परिशिष्ट-२

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | नरखेड | २-सावरगांव |
| २ | नागपूर | नरखेड | ४-भिष्णूर |
| ३ | नागपूर | काटोल | ५-येनवा |
| ४ | नागपूर | काटोल | ६-पारडसिंगा |
| ५ | नागपूर | सावनेर | १३-वाकोडी |
| ६ | नागपूर | सावनेर | १४-केळवद |
| ७ | नागपूर | पारशिवनी | १९-करभांड |
| ८ | नागपूर | रामटेक | २३-बोथिया ( पालोरा) |
| ९ | नागपूर | मौदा | २७-अरोली |
| १० | नागपूर | कामठी | ३४-गुमथळा |
| ११ | नागपूर | कामठी | ३५-वडोदा |
| १२ | नागपूर | नागपूर (ग्रामीण) | ३६-गोधनी ( रेल्वे) |
| १३ | नागपूर | हिंगणा | ४३-निलडोह |
| १४ | नागपूर | हिंगणा | ४४-डिगडोह |
| १५ | नागपूर | हिंगणा | ४५-डिगडोह इसासनी |
| १६ | नागपूर | कुही | ५३-राजोला |

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | नरखेड | ०१-बेलोना |
| २ | नागपूर | नरखेड | ०३-सावरगाव |
| ३ | नागपूर | काटोल | १२-लाडगाव |
| ४ | नागपूर | काटोल | १३-मेटपांजरा |
| ५ | नागपूर | कळमेश्वर | १७-तेलकामठी |
| ६ | नागपूर | कळमेश्वर | १८-कोहळी |
| ७ | नागपूर | सावनेर | २३-बडेगांव |
| ८ | नागपूर | सावनेर | २६-वाघोडा |
| ९ | नागपूर | सावनेर | २८-नांदागोमुख |
| १० | नागपूर | पारशिवनी | ३५-चारगाव |
| ११ | नागपूर | पारशिवनी | ३८-नयाकुंड |
| १२ | नागपूर | रामटेक | ४६-उमरी |
| १३ | नागपूर | रामटेक | ४९-मनसर |
| १४ | नागपूर | रामटेक | ५१-नगरधन |
| १५ | नागपूर | मौदा | ५५-खात |
| १६ | नागपूर | मौदा | ५६-रेवराल |
| १७ | नागपूर | मौदा | ६२-चिरव्हा |
| १८ | नागपूर | कामठी | ६८-महालगाव |
| १९ | नागपूर | कामठी | ७०-बिडगाव |
| २० | नागपूर | नागपूर(ग्रामीण) | ७१-भोकारा |
| २१ | नागपूर | नागपूर(ग्रामीण) | ७४-दवलामेटी |
| २२ | नागपूर | नागपूर(ग्रामीण) | ८०-डोंगरगाव |
| २३ | नागपूर | हिंगणा | ८५-निलडोह वडधामना |
| २४ | नागपूर | हिंगणा | ८७-डिगडोह-१ |
| २५ | नागपूर | हिंगणा | ८९-डिगडोह इसासनी |
| २६ | नागपूर | हिंगणा | ९३-नेरी मानकर |
| २७ | नागपूर | उमरेड | ९८-मकरधोकडा |
| २८ | नागपूर | उमरेड | १०१-देवळी |
| २९ | नागपूर | कुही | १०९-सिल्ली |
| ३० | नागपूर | कुही | ११२-तारणा |
| ३१ | नागपूर | भिवापूर | ११६-नांद |

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक -रानिआ/जिपपस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक १७/३/२०२१ सोबतचे

परिशिष्ट-२

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निवडणुक विभागाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | पालघर | तलासरी | ५- उधवा |
| २ | पालघर | डहाणू | ६-बोर्डी |
| ३ | पालघर | डहाणू | ११-कासा |
| ४ | पालघर | डहाणू | १५- सरावली |
| ५ | पालघर | डहाणू | १८-वणई |
| ६ | पालघर | विक्रमगड | २३-आलोंडे |
| ७ | पालघर | मोखाडा | २८-आसे |
| ८ | पालघर | मोखाडा | २९-पोशेरा |
| ९ | पालघर | वाडा | ३१-गारगांव |
| १० | पालघर | वाडा | ३२- मोज |
| ११ | पालघर | वाडा | ३३-मांडा |
| १२ | पालघर | वाडा | ३४-पालसई |
| १३ | पालघर | वाडा | ३५-आबिटघर |
| १४ | पालघर | पालघर | ४७- सावेरे ऐंबुर |
| १५ | पालघर | पालघर | ४८-नंडोरे-देवखोप |

| अनु.क्र. | जिल्हा | तालुका | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव |
|---|---|---|---|
| १ | पालघर | डहाणू | २०-ओसरविरा |
| २ | पालघर | डहाणू | २९-सरावली |
| ३ | पालघर | वाडा | ६४-सापने बु. |
| ४ | पालघर | पालघर | ७६-नवापूर |
| ५ | पालघर | पालघर | ७७-सालवड |
| ६ | पालघर | पालघर | ८३-सरावली (अवधनगर ) |
| ७ | पालघर | पालघर | ८४-सरावली |
| ८ | पालघर | पालघर | ८७-मान |
| ९ | पालघर | पालघर | ८८-शिगांव खुताड |
| १० | पालघर | पालघर | ८९-बऱ्हाणपुर |
| ११ | पालघर | पालघर | ९१-कांढाण |
| १२ | पालघर | पालघर | १०६-नवघर घाटीम |
| १३ | पालघर | वसई | १०७-भाताणे |
| १४ | पालघर | वसई | १०९-तिल्हेर |

RNI No. MAHBIL/2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक २ (२)] मंगळवार, फेब्रुवारी २, २०२१/माघ १३, शके १९४२ [ पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

### असाधारण क्रमांक ३

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ फेब्रुवारी २०२१

### आदेश

क्रमांक रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र. ३/का-५.— मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९ (१) (ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र. ५९) मधील कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १०-अ व कलम १२ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १५ जानेवारी २०२१ या दिवशी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या, या माहे एप्रिल ते मे २०२१ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

**अविनाश सणस,**
प्रभारी सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.



भाग एक-अ (म.उ.वि.)-३

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.